**[वेळ : २.३० तास]** **[गुण : ७५]**

कृपया तुम्हाला योग्य प्रश्नपत्रिका मिळाली आहे का ते तपासा.

**सूचना : १. सर्व प्रश्न सोडविणे आवश्यक आहे.**
**२. अंतर्गत पर्याय लक्षात घ्या.**
**३. प्रश्नासमोरील अंक गुण दर्शवितात.**

**प्र. १ अ.** 'शहरीकरण' ही संकल्पना सांगून महानगरीकरणाची प्रक्रिया समजाऊन सांगा. १५

**किंवा**

**ब.** महानगरीय संस्कृतीचे वेगळेपण नमूद करून महानगरीय जीवनात कालपरत्वे घडत गेलेल्या बदलांची नोंद करा.

**प्र. २ अ.** महानगरीय साहित्यातून हाताळल्या गेलेल्या विषयांची साधार चर्चा करा. १५

**किंवा**

**ब.** महानगरीय जाणिवांची ओळख करून देऊन महानगरीय साहित्यातून येणाऱ्या प्रतिमा विश्वाचे विश्लेषण करा.

**प्र.३ अ.** महानगरातील खिळखिळीत झालेली कुटुंबव्यवस्था भाऊ पाध्ये यांची कथा कशा रीतीने मांडते याचे उदाहरणासहीत विश्लेषण करा. १५

**किंवा**

**ब.** महानगरात बेघर झालेल्या सामान्य माणसाच्या संघर्षाची कथा जयंत पवार यांचे 'काय डेंजर वारा सुटलाय' हे नाटक कसे रेखाटते त्याचे विवेचन करा.

**प्र.४** प्रत्येक गटातील **एक टीप लिहा. (एकूण तीन)** १५

**अ.** १. महानगर : एक तात्विक विचार

**किंवा**

२. नागर- अनागर संकल्पना

**ब.** १. महानगरीय साहित्यातील वातावरणनिर्मिती.

**किंवा**

२. महानगरीय साहित्याचे भाषास्वरूप

**क.** १. भाऊ पाध्ये यांच्या कथेचे आशयसूत्र : मूल्यऱ्हास

**किंवा**

२. 'काय डेंजर वारा सुटलाय' नाटकातील निवेदक



XSAGARDADMINY31EF5EXSAGARDADMINY31EF5E

**प्र. ५ थोडक्यात उत्तरे लिहा. (प्रत्येक गटातील एक)** **१५**

**अ.** १. 'महानगरीय' अनुभवविश्वाचे चित्रण करा.

**किंवा**

२. महानगरीय समाज जीवनाची वैशिष्ट्ये सांगा.

**ब.** १. महानगरीय समस्या आणि साहित्य यांचा अनुबंध स्पष्ट करा.

**किंवा**

२. महानगरीय साहित्यातील पात्रचित्रणाचे वेगळेपण नोंदवा.

**क.** १. भाऊ पाध्ये यांच्या कथांमधील पात्रचित्रणाचा परिचय करून द्या.

**किंवा**

२. 'काय डेंजर वारा सुटलाय' नाटकाचे भाषाविशेष नोंदवा.

*******************



XSAGARDADMINY31EF5EXSAGARDADMINY31EF5E